

# अर्थव्यवस्था हेलपाटून जाऊ नये, म्हणून...

अलिकडेच महाराष्ट्राचा २०२५-२६ चा अर्थसंकल्प मांडला गेला. त्यामधून राज्याला वित्तीय शिस्तीची किती गरज आहे, हेच अधोरेखित झाले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी अनेक योजनांची खैरात करण्यात आली, त्याच वेळी यामुळे अर्थव्यवस्था हेलपाटून जाईल, असा इशारा अर्थतज्ज्ञांनी दिला होता. या निमित्ताने एकूणच राज्याच्या अर्थव्यवस्थेतील काही दोषस्थळे समजून घेता येतात.

परामर्श

हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार

२०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नामध्ये दोन लाख ७८ हजार रुपयांवरून ३ लाख ९ हजार रुपयांपर्यंत वाढ झाली असली, तरी देशपातळीवर दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक लागतो, पहिला नव्हे! गुजरातने निर्यातीबरोबर दरडोई उत्पन्नातही महाराष्ट्राला मागे टाकून पुढचे स्थान पटकावले आहे. आधी तेलंगण, कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात आणि नंतर मग महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. २०२३-२४ मध्ये राज्याचा विकासदर आठ टक्के होता. यंदा, म्हणजेच २०२४-२५ मध्ये घसरून तो ७.३ टक्क्यांवर येईल. याचा अर्थ 'महाराष्ट्र थांबणार नाही' असे म्हटले जात असले, तरी तो फक्त प्रचाराचाच भाग आहे. उद्योगक्षेत्रात देशात वर्षानुवर्षे आपण अग्रेसर राहिलो. परंतु या क्षेत्राचा विकासदर गेल्या वर्षाच्या ६.२ टक्क्यांवरून घटून ४.९ टक्के होईल, असा अंदाज आहे. त्यातही उत्पादन किंवा निर्मितीक्षेत्रात २०२३-२४ मध्ये विकासदर ६.८ टक्के होता. घसरण होऊन यंदा तो ४.२ टक्के होण्याची शक्यता आहे. वास्तविक, शेतीमधून जास्तीत जास्त लोकांना बाहेर आणून उद्योगात सुस्थापित करायचे असेल तर निर्मितीक्षेत्राचा विस्तार व्हायला हवा. शेती आतबट्ट्याची असल्यामुळे, उत्पादनक्षेत्राची भरभराट होणे आवश्यक आहे. परंतु त्याऐवजी त्याच्या प्रगतीचा वेग मंदावणे, ही चिंतेची बाब आहे. उद्योगांप्रमाणे सेवाक्षेत्रात रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात. पण सेवाक्षेत्रातही ८.३ टक्क्यांवरून ७.८ टक्के अशी पिछेहाट झाली आहे.

आज महाराष्ट्रात कोट्यवधींची गुंतवणूक येत आहे, ही चांगली बाब आहे. परंतु त्या प्रमाणात रोजगारामध्ये वाढ होत असल्याचे दिसत नाही. गेल्या तीन वर्षांमध्ये बेरोजगार व्यक्तींची संख्या ५८ लाखांवरून ७० लाखांपर्यंत वाढली आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची तरतूद करण्याचे बंधन शासनावर आहे. परंतु चालू आर्थिक वर्षात महायुती सरकारने या खर्चाला लक्षणीय प्रमाणात कात्री लावली आहे. तसेच डबल इंजिन सरकार असल्याचे सांगितले जात असले, तरी यंदा केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीमध्ये १९ टक्क्यांची घट होणार असल्याची माहिती आर्थिक पाहणी अहवालात देण्यात आली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून एसटी महामंडळाला ३५०कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. परंतु एसटीला ९९३ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. महामंडळाकडून ३ हजार २६० कोटी रुपयांची देणी थकित आहेत. या परिस्थितीत महामंडळाने कारभार कसा करायचा, असा प्रश्न आहे.

मागील वर्षी सर्वत्र उत्तम पाऊस झाल्यामुळे शेती आणि संलग्न क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला. त्यामुळे गेल्या आर्थिक वर्षात ३.३ टक्के असलेला विकासदर यंदा ८.७ टक्क्यांवर गेला. परंतु यात राज्य सरकारचा असा काहीच वाटा नाही. उलट, राज्यातील महाराष्ट्रातील किरकोळ व्यापारात घट झाली आहे. म्हणजे, लहान-लहान दुकाने, चहा, किराणा वगैरे. त्याउलट ठोक व्यापारात रोजगाराचा टक्का वाढला आहे. छोटे व्यापारी व्यवसाय बंद होत आहेत, तर मोठे वाढत आहेत. वाहतूक सेवेतील रोजगाराची टक्केवारी कमी झाली आहे. पर्यटक, टॅक्सी, ऑटो रिक्षा यात आता पूर्वीसारखी रोजगारक्षमता राहिलेली नाही. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांच्या टक्केवारीत घट झाली आहे. दुसरीकडे, वस्त्रोद्योग म्हणजेच टेलरिंगचे लहान लहान व्यवसाय किंवा छोटे कारखाने यात रोजगाराचा टक्का वाढला आहे. यातील बहुसंख्य महिला आहेत आणि त्यांचे शिलाईचे अगदी लहान, घरगुती स्वरूपाचे व्यवसाय आहेत. इथे टक्केवारी वाढते आहे. आर्थिक निकड भागवण्यासाठी यातील बहुतेक व्यवसाय केले जातात. यातून कुटुंबांवर वाढलेला आर्थिक ताण दिसतो. टपऱ्यांवर अवलंबून असलेल्या रोजगाराचे प्रमाणही वाढले आहे. यातूनही वाढलेला आर्थिक ताण दिसून येतो. घरकामातून रोजगार मिळवणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढले आहे. वित्तीय सेवांमधील रोजगाराची टक्केवारी वाढली आहे. यात प्रामुख्याने पतपेढी वगैरे रोजगार आहे. शेतीबाहेर रोजगाराची टक्केवारी वाढत आहे, हे चांगले; पण त्यातील बराच रोजगार आर्थिक ताणातून काही तरी करण्याची गरज असल्यामुळे केलेला, कमी उत्पादक, कमी मोबदला असलेला, लहान धंदे बंद पडून होत असलेला अस्थायी स्वरूपाचा आहे हे चांगले नाही. हे निष्कर्ष भारत सरकारच्या 'पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे'वरून काढले आहेत.

महाराष्ट्रातील दारिद्र्य आणि विषमता, २०२२-२३ च्या राष्ट्रीय नमुना चाचणीच्या 'कन्झंप्शन एक्स्पेंडिचर सर्व्हे'वरून प्रत्येक राज्यातील दारिद्र्याचे आणि विषमतेचे प्रमाण काढता येते. अर्थात, या सर्व्हेमध्ये खूप श्रीमंत लोक येत नाहीत. त्यामुळे हा सर्व्हे आर्थिक विषमतेचे प्रमाण कमी दाखवतो. ग्रामीण महाराष्ट्राइतकी आर्थिक विषमता इतर कुठल्याही राज्यात नाही. पंजाब, कर्नाटक, गुजरात, उत्तर प्रदेश, बिहार वगैरे राज्यांमध्ये ग्रामीण दारिद्र्य आणि विषमता हे दोन्ही घटक राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहेत. पंतप्रधानाच्या आर्थिक सल्लागार समितीने देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नात्तील महाराष्ट्राचा टक्का कमी झाल्याचा निष्कर्ष काढला आहे. पण महाराष्ट्राची 'आर्थिक पिछेहाट' झाली आहे किंवा नाही याबाबत ठोस निष्कर्ष काढायचा असेल, तर एवढेच पुरेसे नाही. देशाच्या औद्योगीकरणातील महाराष्ट्राचा टक्का कमी होत आहे. महाराष्ट्रात श्रमाची उत्पादकता अजूनही देशापेक्षा जास्त असली तरी हा फरक आता कमी होतो आहे. ही प्रक्रिया २०१४-१५ पासून अधिक वेगाने होत आहे. महाराष्ट्रातील रोजगाराचे स्वरूपही बदलत आहे. स्वयंरोजगार, खास करून महिलांचा स्वयंरोजगार वाढतो आहे. हा रोजगार प्रामुख्याने अगदी लहान-लहान व्यवसायातून आहे. यातील काही भाग तरी कुटुंबावर आर्थिक ताण वाढला, हे आहे. ग्रामीण महाराष्ट्रात दारिद्र्य आणि विषमता यांचे प्रमाण देशातील सरासरीपेक्षा जास्त आहे. एकूणच यावरून राज्याची आर्थिक स्थिती इतर काही राज्यांच्या तुलनेत घसरली आहे आणि शेतीव्यवस्थेने सध्या हात दिला असला, तरी उत्पादन आणि सेवाक्षेत्राने मात्र निराशा केली, असा त्याचा अर्थ आहे.

महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे आणि देशात सर्वाधिक करमहसूल गोळा करणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्राचा वाटा अधिक आहे. गुंतवणुकीच्या क्षेत्रात राज्याने स्वतःचाच विक्रम मोडला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान अलिकडेच म्हटले. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करार केले. या करारांमधून प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्के आहे. राज्यात गेल्या दहा वर्षांमधील सर्वाधिक एक लाख ३९ हजार कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक ही अवघ्या नऊ महिन्यांमध्ये आली आहे. येत्या पाच वर्षांमध्ये घरगुती ग्राहकांच्या वीज दरात २४ टक्क्यांपर्यंत कपात करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच केली आहे. परंतु भूखंड वाटप केले जाताना होणारा भ्रष्टाचार, खंडणी याबद्दलच्या महाराष्ट्रातील उद्योजकांच्या तक्रारीही दूर होणे आवश्यक आहे. केवळ आश्वासने देणे पुरेसे नाही.

सिंचनाखालील क्षेत्र नक्की किती वाढले, याची आकडेवारी गेली बारा वर्षे दिली जात नाही. सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबद्दलचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्ष सिंचनक्षेत्र किती वाढले, हे जनतेला कळणे आवश्यक आहे. आजही राज्याची अर्थव्यवस्था सिंचनावर अवलंबून असून अन्य अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे सिंचन क्षेत्र खूप कमी आहे. कृषि प्रक्रिया उद्योग वाढले पाहिजेत, असे केंद्र आणि राज्य सरकार सतत सांगत असते. परंतु त्यासाठी कृषि सिंचनात लक्षणीय वाढ होणे आवश्यक आहे. राजकोषीय तूट कमी असावी अशी तरतूद असली, तरी यंदा आपण तुटीच्या सीमारेषेच्या जवळ आलो आहोत, ही नक्कीच काळजी करण्यासारखी बाब आहे.






# बलुचिस्तान का पेटले आहे?

बलुचिस्तानमधील 'जाफर एक्स्प्रेस ट्रेन'च्या अपहरणाने आणि नंतर पाकिस्तान सैन्याच्या नोश्की येथिल तळावर हल्ला करुन नव्वद सैनिकांना ठार मारल्याच्या घटनेनंतर बलुची आणि पाकिस्तानी सरकार यांच्यात मोठा संघर्ष पेटला आहे. याबाबत 'बलुची लिबरेशन आर्मी' आणि पाकिस्तानी लष्कराने केलेले दावे काहीही असले, तरी बलुचिस्तानमधील संघर्ष का सुरू झाला आणि त्याचे काय होणार, हे समजून घेतले पाहिजे.

विश्वसंचार

प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

'बलुची लिबरेशन आर्मी'ने बलुचिस्तानमधील क्वेटा ते पेशावर प्रवास करणाऱ्या जाफर एक्स्प्रेस ट्रेनचे अपहरण करण्याच्या बहुचर्चीत घटनेने बलुच आणि पाकिस्तानी राजवटीमध्ये दीर्घकाळ चालत असलेल्या संघर्षाच्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला आहे. हा हल्ला आणि 'बीएलए'च्या सैनिकांनी केलेले अपहरण हे बलुचच्या सततच्या स्वातंत्र्याच्या मागणीचा परिणाम आहे. हा लढा १९४७ मध्ये, म्हणजे पाकिस्तानच्या स्थापनेपासून सुरू असलेल्या आर्थिक दडपशाही, राजकीय उपेक्षितपणा, सांस्कृतिक भेदभाव आणि राज्य प्रायोजित दडपशाहीच्या आरोपांचा परिणाम आहे. १९४७ मधील भारताची फाळणी आणि त्यानंतर पाकिस्तानने बलुचिस्तानवर जबरदस्तीने केलेल्या कब्जात या संघर्षाची बीजे आहेत. बलुच लोक हा पाकिस्तान, इराण आणि अफगाणिस्तानच्या सीमेवर पसरलेला एक वांशिक समुदाय आहे. हा समुदाय त्यांच्या सांस्कृतिक, प्रादेशिक आणि भाषिक वेगळेपणासाठी ओळखला जातो. हे लोक त्यांच्या भागात दीर्घकाळापासून दुर्लक्षित आहेत. 'जैश अल-अदल'सारखे बलुच फुटीरतावादी गट इराणमध्ये सक्रिय आहेत. ते इराणमधील सिस्तान आणि बलुचिस्तान प्रांताच्या स्वातंत्र्याची मागणी करतात. इराण काही वेळा या गटांविरुद्ध लष्करी कारवाई करतो तर अफगाणिस्तानवर या गटांना प्रशिक्षण आणि शस्त्रे यासह गुप्त मदत पुरवल्याचा आरोप आहे. आता तर पाकिस्तानने भारतालाही त्यात गोवले आहे. १९४७ मध्ये भारतापासून वेगळे झाल्यानंतर पाकिस्तानने आपले स्वातंत्र्य घोषित केले, तेव्हा बलुचिस्तान (कलात राज्य) च्या तत्कालीन शासकानेही आपले स्वातंत्र्य घोषित केले.

आता बलुचिस्तान म्हणून ओळखला जाणारा प्रदेश १९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी चार संस्थानांमध्ये विभागला गेला होता, त्यापैकी एक कलात म्हणून ओळखला जात होता. येथील राज्यकर्त्याला खान म्हणत. या व्यतिरिक्त खारान, लास बेला आणि मकरन या इतर तीन संस्थानांनी पाकिस्तानमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला होता. असे म्हणतात की या संस्थानांकडेही भारतात विलीन होण्याचा पर्याय होता; परंतु मोहम्मद अली जिना यांच्या प्रभावामुळे ते शक्य झाले नाही. १८७६ मध्ये ब्रिटिशांशी झालेल्या करारामुळे कलातला आपली अंतर्गत स्वायत्तता ब्रिटिश राजवटीपासून मुक्त झाली. पुढे, भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी, या मुद्द्यावर दिल्लीत शेवटच्या ब्रिटिश गव्हर्नर लॉर्ड माउंटबॅटनशी बैठक झाली होती, मोहंमद अली जिना यांनी कलातच्या स्वातंत्र्याला पाठिंबा दिला होता आणि ५ ऑगस्ट १९४७ पासून बलुचिस्ताननेही स्वातंत्र्य घोषित केले होते. त्याच वेळी, उर्वरित तीन प्रांतांनी संपूर्ण बलुचिस्तान तयार करण्याचा निर्णय घेतला. जम्मू-काश्मीरप्रमाणेच बलुचिस्तानच्या राज्यकर्त्यांनाही त्यांच्या राज्याची स्वायत्तता कायम ठेवायची होती; पण पाकिस्तान सरकारने भारताच्या प्रभावाच्या भीतीने स्वातंत्र्यानंतर अवघ्या सात महिन्यांमध्ये, मार्च १९४८ मध्ये आपले सैन्य पाठवले. तेव्हा बलुच जनतेने पाकिस्तानी राजवटीच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. येथूनच वाद सुरू झाला, जो आज हिंसक संघर्षात रूपांतरित झाला आहे. तिथे बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले आणि अपहरणांची प्रकरणे समोर येत आहेत.

बलुच जन्तेने १९४८, १९५८-५९, १९७३-७७ आणि २००४ मध्ये पाकिस्तानच्या सरकारविरुद्ध निकराचे लढे दिले. विशेषत: आर्थिक दडपशाही, राजकीय उपेक्षा आणि सांस्कृतिक भेदभाव यासह अनेक मुद्द्यांच्या निषेधार्थ ही बंडखोरी झाली. बलुच जनतेच्या मागण्या आणि त्याकडे दुर्लक्ष करण्याच्या पाकिस्तान सरकारच्या कृतीमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. पाकिस्तान सरकार कठोरपणे लागू करत असलेल्या अतिराष्ट्रवादाच्या तुलनेत बलुचांची वांशिक ओळख अगदी उलट आहे. बलुच लोकांनी आपल्या वेगळ्या भाषा, संस्कृती आणि परंपरांसह, पंजाबीबहुल पाकिस्तानच्या संस्कृतीत विलीन होण्याचा दीर्घकाळ प्रतिकार केला आहे. यामुळे बलुच लोकांमध्ये परकेपणा आणि उपेक्षितपणाची भावना निर्माण झाली आहे. त्यांना वाटते की त्यांची ओळख आणि हक्क पाकिस्तानी राजवटीने हिरावले. त्यांचा आदर केला नाही. दुसरीकडे, पाकिस्तान सरकार अनेक बलुच राष्ट्रवादी गटांना दहशतवादी मानते. तिथे कोणताही निषेध किंवा सुधारणांची मागणी लष्करी शक्तीच्या मदतीने दाबली जाते. त्याचा परिणाम असा झाला की बलुचिस्तानमधील मानवी हक्क परिस्थिती दयनीय झाली. उदाहरणार्थ, बलुच अनेकदा पाकिस्तानी लष्करावर न्यायालयीन हत्या आणि अत्याचाराचा आरोप करतात.



बलुचिस्तान हा पाकिस्तानचा सर्वात मोठा आणि कमी लोकसंख्या असलेला प्रांत आहे, तरीही तो सर्वात गरीब आणि मागासलेला प्रदेश आहे. हा प्रांत नैसर्गिक वायू, कोळसा, तांबे आणि इतर खनिजांसह नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहे. पाकिस्तानी सरकार तिथे अनेकदा जबरदस्तीने उत्खनन आणि ड्रिलिंग करते. आता तेथे चीनचा प्रभाव वाढत आहे. त्याला 'बलुची लिबरेशन आर्मी'आणि इतर सशस्त्र गटांचा विरोध आहे. उदाहरणार्थ, नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असूनही बलुच लोकांची गरिबी आणि अडचणी कमी होत नाहीत. चीनी अर्थसहाय्यीत ग्वादर मेगा-पोर्टच्या बांधकामामुळे संकट आणखी वाढले आहे. हे बंदर सामरिकदृष्ट्या पाकिस्तानसाठी महत्त्वाचे असले, तरी बलुचिस्तानमध्ये असूनही बलुच जनता विकास प्रक्रियेपासून दूर आहे. ग्वादरच्या आजूबाजूच्या जमिनीची बेकायदेशीर विक्री झाली आहे. त्यामुळे स्थानिक बलुच लोकसंख्येच्या जीवावर मोठ्या प्रमाणात नफा कमावला जात असल्याचा आरोप पाकिस्तान सरकारवर झाला आहे. पाकिस्तानी राजवटीच्या दडपशाहीचा आणि राजकीय उपेक्षितपणाचा हा परिणाम आहे, की बलुचिस्तानमधील लोक फुटीरतावादात गुंतले आहेत. याला प्रत्युत्तर म्हणून गेल्या काही वर्षांत अनेक बलुच फुटीरतावादी गट उदयास आले आहेत. ते पाकिस्तानी लष्कराविरुद्ध राजकीय हिंसाचार करत आहेत. बलुचिस्तानला अधिक पूर्ण स्वातंत्र्य मिळवून देणे हे 'बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट' (बीएलएफ) आणि बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) या गटांचे लक्ष्य आहे.

'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी' (बीएलए) हा सर्वात मोठा बलुच फुटीरतावादी गट असून अनेक दशकांपासून पाकिस्तान सरकारच्या विरोधात बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची मागणी करत आहे. पाकिस्तान, अमेरिका आणि ब्रिटनसारखे देश 'बीएलए'ला दहशतवादी संघटना मानतात. या गटाने बलुचिस्तानमध्ये सुरक्षा दल, सरकारी इमारती आणि चिनी सैन्य आणि त्यांच्या कामगारांना लक्ष्य करत अनेक हल्ले केले आहेत. अलिकडच्या वर्षांमध्ये येथे चीनचा प्रभाव वाढल्याने 'बीएलए'ने आपले हल्ले तीव्र केले आहेत. अनेक आत्मघाती हल्ले आणि मोठ्या हल्ल्यांसाठी 'बीएलए' जबाबदार आहे. 'बीएलए'चे आत्मघाती पथक मानले जाणारे मजीद ब्रिगेड अनेक हाय-प्रोफाइल हल्ल्यांमध्ये सामील आहे. २०१८ मध्ये कराचीतील चीनी दूतावासावर झालेला हल्ला आणि २०१९ मध्ये ग्वादरमधील एका लक्झरी हॉटेलवरील हल्ल्यामध्ये ते सहभागी होते. 'चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर' हा एक अब्ज डॉलर्सचा प्रकल्प अलीकडच्या काळात बलुचिस्तानमधील संघर्षाचे एक प्रमुख कारण आहे, तर पाकिस्तान सरकार 'सीपीईसी'ला देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी 'गेमचेंजर' म्हणून पाहत आहे, तर बलुच लोक याकडे चीनसाठी त्यांच्या संसाधनांचे शोषण करण्याचे आणि त्यांना आणखी दुर्लक्षित करण्याचे एक साधन म्हणून पाहतात. या प्रकल्पांमुळे समाजातील लोक मोठ्या संख्येने विस्थापित झाले आहेत. या भागाचे लष्करीकरण झाले असून येथे चीनी कामगार मोठ्या संख्येने रहात आहेत. त्यामुळे पाकिस्तानी राजवटीविरुद्ध बलुचांचा राग आणखी वाढला आहे.

'बीएलए' आणि इतर बलुच फुटीरतावादी गटांनी पाकिस्तानमधील चीनी गॅस आणि इतर प्रकल्प तसेच चीनी कामगारांना वाढत्या प्रमाणात लक्ष्य केले आहे. या हल्ल्यांचा उद्देश 'सीपीईसी'ला आळा घालणे आणि बलुचिस्तानमध्ये चीनच्या सहभागाला कडाडून विरोध केला जाईल, असा संदेश देणे हा आहे. बलुचिस्तानमधील मानवाधिकार परिस्थितीचे गांभीर्य असूनही, आंतरराष्ट्रीय स्तरावर या संघर्षाकडे दुर्लक्ष केले जाते. सामाजिक कार्यकर्ते आणि नेत्यांनी पाकिस्तान सरकारवर या प्रदेशात नरसंहार केल्याचा आरोप केला आहे; परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर या आरोपांची फारशी दखल घेतली गेलेली नाही किंवा कारवाई झालेली नाही. 'जाफर एक्सप्रेस'च्या अपहरणानंतरही हा संघर्ष थांबणार नाही. उलट, आता बंडखोर गटांनी पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांताचा ताबा घेतल्यासारखीच स्थिती आहे.

साहित्य मैफल
रविवार, दि. २३ मार्च २०२५ पान ०२




# आंध्रमध्ये आरक्षणाचे राजकारण

**भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष तेलंगणामध्ये आरक्षणावरून राजकारण करत आहेत. आरक्षणाच्या राजकारणाचे बुमरँग होऊ शकते, याची जाणीव दोन्ही पक्षांना नाही. या राज्यात काँग्रेसने ओबीसींच्या आरक्षणवाढीचा तर भाजपने मुस्लिमांच्या राजकारणाचा मुद्दा उचलून धरला आहे. बिहार विधानसभेच्या निवडणुकीसाठी तेलंगणाच्या भूमीमध्ये आरक्षणाचे राजकारण खेळले जात आहे. त्या निमित्ताने...**

राज्यरंग

**राही भिडे, ज्येष्ठ पत्रकार**

महाराष्ट्रात मराठा, धनगर आरक्षणावरून घातल्या गेलेल्या घोळाला राजकारणच कारणीभूत आहे. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली आरक्षणाची मर्यादा हटवल्याशिवाय वाढीव आरक्षण देता येणार नाही, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ असताना राजकीय पक्ष मात्र वेगवेगळ्या समाजघटकांची मते मिळवण्यासाठी आरक्षणाचा निर्णय घेतात आणि त्यावरून दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करुन त्यावरही राजकीय पोळी भाजतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ मध्ये भाजप नेत्यांना पसमंदा मुस्लिमांमध्ये संपर्क वाढवण्याचा सल्ला दिला होता. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी अलीगडमध्ये झालेल्या एका निवडणूक सभेत मोदी यांनी काँग्रेस आणि समाजवादी पक्षावर पसमंदा मुस्लिमांना उपेक्षित ठेवल्याचा आरोप केला होता. पसमंदा समाजाला संधी द्यावी, असा सल्ला त्यांनी दिला होता; पण आता प्रश्न निर्माण झाला आहे, की भाजपचा पसमंदा मुस्लिमांबाबत भ्रमनिरास झाला आहे का? तेलंगणामध्ये नुकत्याच झालेल्या एका जाहीर सभेत केंद्रीय गृह राज्यमंत्री आणि करीमनगर बंदीचे भाजप खासदार संजय कुमार यांनी खळबळजनक विधान केले. तेलंगणात मुस्लिमांना मागासवर्गीय श्रेणीत कसे समाविष्ट केले जात आहे, असा सवाल त्यांनी केला. बंडी संजय कुमार यांनी जाहीर सभेत उपस्थित लोकांसमोर स्पष्टपणे सांगितले की, केंद्र सरकार मुस्लिमांचा मागासवर्गीय प्रवर्गात समावेश करण्यास कधीही मान्यता देणार नाही. तेलंगणातील काँग्रेस सरकारने केलेल्या जात सर्वेक्षणाबाबत केंद्रीय मंत्र्याचे हे वक्तव्य आले आणि आरक्षणाचा नवा पैलू समोर आला.

तेलंगणाच्या काँग्रेस सरकारने नुकताच सर्वेक्षण अहवाल सार्वजनिक केला होता. या जात सर्वेक्षण अहवालानुसार, तेलंगणामधील फक्त २.४८ टक्के मुस्लिम 'फॉरवर्ड जातीं'मधील आहेत तर उर्वरित १०.०८ टक्के मुस्लिम मागासवर्गीय श्रेणीत येतात. संजयकुमार यांच्या मुद्द्याला सिकंदराबादचे खासदार किशन रेड्डी यांचे समर्थन आहे. किशन रेड्डी म्हणाले की भारतीय जनता पार्टी मागासवर्गीयांना हिंदू आणि मुस्लिम मागासवर्गात विभागण्याच्या कल्पनेच्या पूर्णपणे विरोधात आहे. काँग्रेसच्या तेलंगणा सरकारने मागासवर्गीय मुस्लिमांना राज्य सरकारी नोकऱ्या आणि सरकारी शैक्षणिक संस्थांमध्ये चार टक्के आरक्षण दिले आहे. जात सर्वेक्षण अहवाल आल्यापासून मुस्लिमांना दिलेले आरक्षण संपवण्याची मागणीही जोर धरू लागली आहे. भाजपच्या मंत्र्यांची पसमंदा मुस्लिमांच्या विरोधात येणारी वक्तव्ये दाखवतात की त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे भाजपचे प्रयत्न यशस्वी झालेले नाहीत. भाजप नेत्यांच्या एका गटाच्या मते पसमंदा समुदायापर्यंत पोहोचण्यासाठी सुरू केलेल्या मोहिमेचा कोणताही परिणाम झालेला नाही. दक्षिणेतील पाचपैकी तीन राज्यांमध्ये मुस्लिमांना आरक्षण मिळत असून मुस्लिमांना आरक्षण देण्याच्या मुद्द्यावरून सातत्याने वाद होत आहेत. कर्नाटकमधील बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने २०२३ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मुस्लिमांना दिलेले चार टक्के आरक्षण रद्द केले होते. धर्माच्या आधारे आरक्षण देता येत नाही, असा भाजप सरकारचा युक्तिवाद होता.

१९९४ ते २०२३ दरम्यान कर्नाटकमध्ये मुस्लिमांना २ बी श्रेणीअंतर्गत आरक्षण मिळत होते; भाजप सरकारने ते रद्द केले, मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपचा पराभव झाला आणि काँग्रेसने तेथे सरकार स्थापन केले. सध्याच्या काँग्रेस सरकारने मुस्लिमांच्या आरक्षणाला पाठिंबा दिला असला तरी त्यांचे आरक्षण अद्याप बहाल केलेले नाही. या मुद्द्यावरून 'एनडीए'मध्येही संघर्ष सुरू होऊ शकतो, कारण तेलंगणाच्या शेजारच्या आंध्र प्रदेशमध्येही मुस्लिमांना दिलेले मागासवर्गीय आरक्षण संपवण्याची मागणी करण्यात आली आहे; मात्र राज्यातील तेलुगू देसम पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारने आपण या प्रकरणी मुस्लिम समाजासोबत असल्याचे म्हटले आहे. भाजपच्या अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांची भूमिका संदिग्ध आहे. भाजप मुस्लिम आरक्षणाच्या विरोधात आहे; पण मुस्लिम ओबीसींना दिलेल्या आरक्षणाच्या विरोधात नाही. आर्थिकदृष्ट्या मागासलेले मुस्लिम 'ईडबल्यूएस' श्रेणीअंतर्गत दहा टक्के आरक्षणाचा लाभ घेऊ शकतात, असा त्यांचा युक्तिवाद असतो. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आरक्षण देता येत नाही, हे माहीत असूनही बहुतांश राज्ये त्यापेक्षा जास्त आरक्षण देतात. नंतर या आरक्षणाला आव्हान दिले जाते आणि ते टिकत नाही. महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचे जे बुमरँग झाले, तेच आता तेलंगणामध्ये होत आहे. काँग्रेस सरकारने ओबीसी आरक्षणाचा डाव खेळला असला, तरी तो अंगलट येण्याची शक्यता आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सातत्याने अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना त्यांच्या लोकसंख्येनुसार आरक्षण देण्याची वकिली करत आहेत. आता काँग्रेसशासित तेलंगणा सरकार इतर मागासवर्गीयांना (ओबीसी) ४२ टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन पूर्ण करण्याच्या विचारात आहे; परंतु पक्षासाठी तसे करणे सोपे होणार नाही. मागासवर्गीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, राज्य सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याचा काँग्रेस सरकारच्या ओबीसी आरक्षण विधेयकाचा उद्देश आहे. मार्चमध्ये होणाऱ्या विधानसभेच्या अधिवेशनामध्ये ओबीसी आरक्षणाशी संबंधित विधेयक मांडणार असल्याचे काँग्रेस सरकारने म्हटले आहे. काँग्रेसचे हे पाऊल तेलंगणातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी जोडले जात आहे; पण यात खरी अडचण अशी आहे, की ४२ टक्के आरक्षण दिल्याने सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेचे उल्लंघन होईल. केंद्र सरकार सहकार्य करत नाही, तोपर्यंत तेलंगणा सरकार हे पाऊल उचलू शकत नाही. तेलंगणामध्ये नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी तेलंगणा काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष आणि विद्यमान मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी 'कामारेड्डी जाहीरनाम्या'वर स्वाक्षरी केली होती, याची आठवण करून द्यावी लागेल.

हरियाणा, महाराष्ट्र आणि दिल्लीतील पराभवानंतर काँग्रेसचे लक्ष आता बिहारकडे आहे. आंध्र प्रदेशमध्ये काँग्रेसचे सरकार स्थापन झाल्यावर या आश्वासनाचा परिणाम झाल्याचे सांगण्यात आले. आता हे आश्वासन पूर्ण करण्याचे आव्हान काँग्रेस सरकारसमोर आहे. गेल्या आठवड्यात रेड्डी सरकारने जात सर्वेक्षणाचा अंतिम अहवाल सभागृहात सादर केला आणि पक्षाने सांगितले की ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना ४२ टक्के जागा देण्याचे वचन पाळतील. दरम्यान, भाजपने काँग्रेस सरकारवर टीका करत ओबीसी समाजाची नीट गणना केली नसल्याचे म्हटले आहे. भाजपचे राज्यसभा खासदार आर. कृष्णय्या यांचा दावा आहे, की तेलंगणामध्ये ओबीसी समाजाची लोकसंख्या ६१ टक्के आहे. ११७ जागांच्या तेलंगणा विधानसभेमध्ये काँग्रेसचे ६४ आमदार आहेत. त्यामुळे विधानसभेत ओबीसी आरक्षण विधेयक मंजूर केले जाईल; परंतु त्याची अंमलबजावणी झाल्यानंतर तेलंगणातील आरक्षणाची मर्यादा ६२ टक्क्यांपर्यंत पोहोचेल. यामुळे सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन होईल. आरक्षण लागू करण्यासाठी राज्यघटनेत दुरुस्ती आणि केंद्र सरकारची मंजुरी आवश्यक आहे. अशा परिस्थितीत या विधेयकाची अंमलबजावणी होणार, की नाही याबाबत साशंकता आहे. 'एआयएमआयएम'चे प्रमुख ओवेसी आणि समाजवादी पक्षाचे खासदार इक्रा हसन यांनी या विधेयकाला विरोध दर्शवला.

गेल्या वर्षी, बिहार विधानसभेने एक विधेयक मंजूर केले. त्यात अत्यंत मागास, इतर मागास वर्ग (ओबीसी), अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) साठी आरक्षण वाढवले गेले. एकूण कोटा ५० टक्क्यांवरून ६५ टक्क्यांपर्यंत वाढवला गेला. मात्र पाटणा उच्च न्यायालयाने हे विधेयक फेटाळले, तर सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला. बिहार सरकारचे हे पाऊल घटनेने दिलेल्या समानतेच्या अधिकारात हस्तक्षेप करेल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. दरम्यान, तेलंगणा सरकारने जात सर्वेक्षणासह अनुसूचित जातींचे उप-वर्गीकरण मंजूर केले. तेलंगणा विधानसभेच्या विशेष अधिवेशनात जात सर्वेक्षण अहवाल सादर करण्याबरोबरच मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रस्ताव मांडला. तसेच एक सूत्र सुचवले. अनुसूचित जाती कोट्यातील ५९ पोटजातींसाठी द्यावयाच्या आरक्षणाची टक्केवारी प्रत्येकाच्या लोकसंख्येवर आधारित असेल, असे त्यांनी सांगितले. सभागृहाने जात सर्वेक्षण अहवाल आणि उप-वर्गीकरण प्रस्ताव स्वीकारले. त्याला विरोधी भारत राष्ट्र समिती आणि भाजपने पाठिंबा दिला. मात्र, अनुसूचित जातींना आपली प्राथमिक मतपेढी मानणारे दलित नेते आणि पक्ष उप-वर्गीकरणाच्या विरोधात उतरले. कारण अनुसूचित जातींमध्ये फूट पाडून त्यांना कमकुवत करण्याचा हा डाव असल्याची भीती त्यांना वाटत होती. ■■■

---

# संयम पाळणे गरजेचे

**छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यातील काही भागावर आधारित 'छावा' हा चित्रपट पाहून लोकांच्या प्रक्षोभित झालेल्या भावना आणि त्यातून निर्माण झालेल्या विद्वेषाच्या भावनेतून उसळलेला हिंसाचार आपण पाहिला. त्यानंतर औरंगजेबाची कबर इथे हवीच कशाला, हा प्रश्न ऐरणीवर आला. मात्र तो सोडवण्याचे संवैधानिक मार्गही आहेत. रस्त्यावर उतरुन याचे उत्तर कधीच मिळणार नाही. उलटपक्षी, याने अनर्थच घडेल.**




लक्षवेधी

**शमसुद्दिन तांबोळी, ज्येष्ठ अभ्यासक**

औरंगजेबाच्या कबरीच्या निमित्ताने अलिकडेच महाराष्ट्रातील वातावरण पेटले आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहिला. दोन्ही गटांनी आक्रमक भूमिका घेतल्यामुळे या संवेदनशील विषयावरुन अनास्थेची कोणतीही स्थिती उत्पन्न होऊ नये, ही राज्यातीलच नव्हे तर देशातील प्रत्येक नागरिकाची अपेक्षा आणि इच्छा आहे. एकूणच सहिष्णुता, सर्वसमावेशकता आणि बहुविविधता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य असून वर्षानुवर्षे तिचे जतन होत आले आहे. आपल्या देशाला अनेक वर्षांचा इतिहास आहे. असा इतिहास असतो तेव्हा अनेक वैभवशाली, गौरवशाली घटना, व्यक्ती, राज्यकर्ते तसेच समाजाला दिशा देणारे धुरिणी असतात; त्याचबरोबर सर्वसमावेशक आणि बहुपेडी संस्कृतीला नख लावणारे किंवा अन्यायी, अत्याचारी, शोषणकर्ते आणि राज्यकर्त्यांचा उल्लेखही इतिहासाच्या याच पानांमध्ये केलेला असतो. त्यामुळेच इतिहासाच्या पाऊलखुणा शोधताना स्वाभाविकच आपल्याला चांगल्या गोष्टींबद्दल, आदर्शांबद्दल माहिती मिळते, त्याचप्रमाणे अशा अन्यायी प्रवृत्तींचीही ओळख होते. अशा दोन्ही प्रकारच्या मानसिकतेचा अभ्यास करत, त्यातून बोध घेत पुढची पिढी वा समाज घडतो.

सध्या महाराष्ट्रातील तापलेले वातावरण हे अलिकडच्या विचारांचे फलित नसून गेल्या काही वर्षांपासूनच हे मुद्दे धुमसत आहेत यात शंका नाही. आता या धुमसणाऱ्या विचारांनी उचल खाल्ली आहे, इतकेच म्हणावे लागेल. 'छावा' या चित्रपटाने या विषयाला पुन्हा एकदा हवा दिली. खरे पाहता 'छावा' असो वा यासारखा कोणताही ऐतिहासिक चित्रपट म्हणजे इतिहास नसतो. असे चित्रपट वा नाटके इतिहासातील काही घटनांवर आधारित असतात. मात्र 'छावा'ने अनेक हिंदू बांधवांच्या भावना प्रक्षोभित केल्या. विशेषत: चित्रपटाचा शेवटचा भाग पाहताना, आपण हा चित्रपट पाहतोय याचे भानही अनेकांना उरले नाही. भावनेचा हा उद्रेक परिस्थितीचे गांभीर्य वाढवण्यास कारक ठरला. खरे पाहता हा चित्रपट ज्यावर बेतला आहे, ती 'छावा' नावाची कादंबरी अनेकांनी वाचली असेल. मात्र ती बाजारात आली तेव्हा अशा प्रकारे कोणतीही परिस्थिती उद्भवल्याचे वा जनमत प्रक्षुब्ध झाल्याचे स्मरत नाही. मात्र भावना दुखावण्याला ताजे निमित्त पुरले आणि विषयाला नको ते वळण लागले.

अशाच प्रकारे महंमद पैंगबरांवर चित्रपट नको, अशी मागणी झाल्याने मुस्लीम समाजाच्या भावना क्षुब्ध झाल्याचे आपण पाहिले आहे. या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणीही केली गेली आहे. त्याचप्रमाणे मुस्लीम समाजाकडून सलमान रश्दी वा तस्लीमा नसरीन यांच्या अभिव्यक्तीवर घाला घालणारी आंदोलने झाली आहेत. त्यामुळे समाजभावनेचा उद्रेक होणे ही काही आजची व्यथा नाही. मात्र औरंगजेबाची कबरच उखडून टाका, या मागणीचा आताइतका जोर पूर्वी कधीच दिसला नाही. मात्र आधी उल्लेख केल्याप्रमाणे 'छावा' बघताना आपण चित्रपट पाहतोय की वास्तव बघतोय याचे भान हरपले आणि हा प्रश्न नव्याने चर्चेत आला. चित्रपट पाहताना भावविवश होत लोकांनी पडदा फाडल्याची उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत. दुर्दैवाने अशा प्रकारच्या लोकभावनेचा राजकीय लाभापोटी वापर करुन घेण्याचे तंत्र काही लोकांना सापडले आहे. खरे तर भावनातिरेकाने संतापलेल्या लोकांना शांत करणे, नियंत्रित करणे, समजावणे, एखाद्या गोष्टीकडे कशा दृष्टीने पहावे यासंबंधीची त्यांची समज वाढवणे गरजेचे असते. मात्र ते सोडून राजकारण्यांनी सद्यस्थितीत आपल्याला हवे ते मिळवले आहे.

इथे लक्षात घ्यायला हवे की, औरंगजेब हा भारतातील मुसलमानांचा आदर्श नाही वा दैवतही नाही. किंबहुना, इस्लाममध्ये कायमस्वरुपी कबर बांधण्यासही मान्यता नाही. चबुतराही बांधू नये, अशी शिफारस इथे केलेली आहे. त्यामुळेच मक्केला पैंगबरांच्या काबाला विरोध करणारे काही मुस्लीम विचारवंत, पंथ आहेत. अशा कट्टरपंथियांकडून काबा उडवून देण्याच्या धमक्याही दिल्या गेल्या आहेत. त्यांना ही कबर संस्कृतीच नको आहे. अल्ला एकच आहे, त्यामुळेच त्याचा प्रेषित असणाऱ्या पैंगबराचे थडगे असण्याचे काहीच कारण नाही, हा विचार ते मांडतात आणि मानतात.

औरंगजेबाबद्दल बोलायचे तर तो जुलमी होता, धर्मांध होता पण तेवढाच तो त्याच्या अंगाने धर्माप्रमाणे चालणारा होता. त्यामुळेच लोकांचा पैसे खासगी गरजांसाठी वापरायचा नाही, हा नियम त्याने पाळला. स्वत: टोप्या शिवून त्याने आपल्या अंत्यविधीसाठी पैसे जमा केले होते. तो स्वत:च्या हाताने कुराण लिहीत होता आणि त्यातून पैसे मिळवत होता. या आणि यासारख्या त्याच्या धार्मिकतेच्या गोष्टी व्यक्तिगत पातळीवरच्या आहेत. अशा या माणसानेही आपली कबर बांधलेली नसावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. औरंगजेबाचे यासंबंधीचे विचार व्यक्त करणारी दोन-चार वाक्ये आजही त्याच्या कबरीजवळ लिहिलेली आहेत. त्याला दफन केलेल्या जागी अगदी साधी माती होती. पण पुढे व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी या स्थळाच्या जागी संगमरवरी बांधकाम केले. म्हणजेच औरंगजेबाच्या मृत्यूनंतर बऱ्याच वर्षांनी त्या ठिकाणाला मिळालेले हे रुप आहे. त्यामुळेच आता हा केंद्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या अख्यतारीत असणारा विषय उरतो.

औरंगजेब आपला आदर्श, दैवत नसताना आणि एकाही मुसलमानाच्या घरात त्याचा फोटोही नसताना हा मुद्दा चिघळण्याचे काहीही कारण नाही. धूर्त, धर्मांध असणाऱ्या औरंगजेबाच्या कबरीच्या जागी लोक श्रद्धेने जातात आणि पूजापाठ करतात, असेही नाही. त्याला दर्गाही म्हटले जात नाही. म्हणजेच तिथे भेट देणारे याकडे केवळ ऐतिहासिक स्थळ म्हणूनच बघतात. इतकेच त्या स्थळाचे महत्त्व आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे.

असहिष्णुता आणि परधर्मद्वेषाच्या भावनेची अनेक उदाहरणे जगाने पाहिली आहेत. अफगाणिस्तानासारख्या मुस्लीम देशामध्ये बुद्धाच्या मूर्ती उद्ध्वस्त केल्या गेल्याचे उदाहरण पुरेसे बोलके आहे. खरे पाहता बुद्धाने तिथे कोणतेही आक्रमण केले नव्हते, अत्याचार केले नव्हते. तरीही शांतता, अहिंसेचे प्रतीक असणाऱ्या बुद्धाच्या मूर्तींची तिथे विटंबना करण्यात आली. ही असहिष्णुता आहे. पण भारताचा इतिहास खूप वेगळा आहे. हिंदुस्तानचा वेगळा आदर्श आहे. आम्ही म्हणू तो कायदा, आम्ही म्हणू ती संस्कृती असा खाक्या इथे नाही. मात्र अफगाणिस्तानसारख्या देशांमध्ये दिसणारी ही प्रवृत्ती आता इथे दिसू लागली आहे का, अशी शंका ताज्या घटनांमुळे उत्पन्न होते, कारण आम्ही म्हणू तोच हिंदू समाज, आम्ही म्हणू तोच कायदा... हा विचार आता दामटवला जाताना दिसतो आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला पण त्यांनीच त्याच्या कबरीसाठी, तेथील दिवाबत्तीसाठी आर्थिक मदतही केली. शिवाजी महाराज असे होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर खुल्दाबादमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी त्याच्या कबरीचा भाग दुरुस्त केल्याचे वा देखभालीसाठी काही रक्कम मंजूर केल्याचे दाखले मिळतात. मुघलांच्या कैदेत असताना औरंगजेबाची मुलगी शाहू महाराजांची देखभाल करत असे. याचे स्मरण ठेवून मृत्यू झाल्यानंतर तिच्या स्मरणार्थ शाहू महाराजांनी साताऱ्यामध्ये मशीद बांधली होती. औरंगजेबाच्या मुलीच्या नावाने शाहू महाराजांनी बांधलेली ही 'बेगम मशीद' आजही बघायला मिळते. म्हणजेच हे शासक कोणत्याही एका धर्माचे विरोधक नव्हते, तर त्यांनी तशा मानसिकतेचा, अत्याचारी प्रवृत्तीचा विरोध केला होता. त्यामुळेच ती व्यक्ती संपल्यानंतर वैरही संपले. थोडक्यात मरणानंतर वैर संपते, हे आपल्या संस्कृतीनेच सांगितले, शिकवले आहे. राजांनी त्याचे पालन केले. हिंदू धर्माने कायमच सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणून आपण शिवाजी महाराजांकडे पाहतो. त्यामुळेच राजांचा आदर्श घेणाऱ्यांनी, त्यांना दैवत मानणाऱ्यांनी सहिष्णुतेचे धडे घेणे गरजेचे वाटते.

सध्याच्या वादामुळे सामान्य मुसलमानांच्या मनामध्ये भीती आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती दिसून येत असल्यामुळे धास्ती वाढत आहे. अलिकडेच रत्नागिरीमध्ये एका मशिदीच्या संदर्भात वादविवाद होऊन दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर विटे गावानजिकचा एक दर्गाही रात्रीतून उद्ध्वस्त केला गेला. असेच प्रकार नागपूर, औरंगाबादला पहायला मिळाले. यातून आपण नेमके काय साधणार आहोत, कारण इथे तर औरंगजेब नाही. तिथे अफजलखानही नाही. थोडक्यात यांच्या नावाखाली मुस्लीम समाजावर निशाणा साधण्याचे काम होत आहे. ही परिस्थिती खात्रीने हिंदुत्ववादी राजकारण उचल खात असल्याचे दर्शवते. यातून एकात्मतेपुढे येणारे प्रश्न अधिक जटील होण्याची भीती आहे. त्यामुळेच दोन्ही समाजांनी विचारपूर्वक वर्तन करायला हवे. मुस्लीम समाजाने औरंगजेबाच्या कबरीसंदर्भात बाऊ करण्याची गरज नाही. याविरुद्ध मत मांडायचेच असेल तर कायदेशीर मार्गांचा अवलंब करायला हवा. सरकार वा सांस्कृतिक मंत्रालयाच्या रास्त मागण्यांची दखल घेऊन. मात्र ते सोडून जनजीवन विस्कळित करणे, जाळपोळ, मारहाण करणे आणि संपूर्ण समाजाला धारेवर धरणे अत्यंत चुकीचे आहे. यातून वर्तमानाचे नुकसान होईलच खेरीज भविष्यासाठीही ही बाब दुर्दैवी असेल. ■■■

# शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांचं काय करायचं?

शिक्षकांवरचे अशैक्षणिक कामाचे ओझे कमी केले पाहिजे, याबाबत दुमत नाही. पण, या कामांमुळेच विद्यार्थ्यांना लिहिता-वाचता येत नाही, हा शिक्षकांचा बचावही फसवा आहे. काम न करणारे ही ढाल वापरतात. गुणवत्तेसाठी अशैक्षणिक कामे बंद व्हायला हवीतच; पण शिक्षकांनीही अध्यापन आणि पूर्वतयारीसाठी वेळ दिला पाहिजे.

शिक्षकांची अशैक्षणिक कामे कमी करण्यासंदर्भात शिक्षणमंत्री एक प्रारूप तयार करत आहेत, हे स्वागतार्ह आहे. दादा भुसे शिक्षणमंत्री झाल्यावर पहिल्या भेटीत मी त्यांना निवेदन दिले. त्यात शिक्षकांची अशैक्षणिक कामे कमी करण्यासाठी शिक्षक आणि अधिकारी यांची एक समिती करावी, अशी मागणी केली. त्याला त्यांनी दिलेला हा प्रतिसाद समाधानकारक आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाने निवडणूक आणि जनगणना वगळता अन्य कामे शिक्षकांना दिली जाणार नाहीत, असे स्पष्ट करुनही अशी कामे वाढत गेली. निवडणूक आणि जनगणना या कामांची चर्चा होते. पण, जनगणना १० वर्षांनी असते (या दशकात तर तीसुद्धा नाही) आणि निवडणूक ५ वर्षांनी असते. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, विधानसभा आणि लोकसभा या फार तर ५ निवडणुका. त्यांची प्रशिक्षणे धरून ५ वर्षांत साधारण २० दिवस खर्च होतात. त्यामुळे जनगणना आणि निवडणुका यामध्ये शिक्षकांचा फार वेळ जात नाही.

मात्र, ज्या शिक्षकांना बीएलओचे काम दिलेले असते, त्यांचा मात्र खूप वेळ जातो. त्यांना मतदार यादीच्या दुरुस्तीपासून स्लिप वाटण्यापर्यंतची सगळी कामे करावी लागतात. त्यांचे हे काम कमी केले पाहिजे.

निवडणूक, जनगणना यापेक्षा शिक्षकांचा खरा वेळ कागदपत्रे जमवणे आणि विविध योजना, स्पर्धा, बैठकांमध्येच जातो. सिस्कॉम या संस्थेने एकदा शिक्षण सचिवांच्या डायरीची पडताळणी केली, तेव्हा तीन महिन्यांत ते १२५ पेक्षा जास्त बैठकांना उपस्थित असल्याचे दिसले. हे शिक्षण सचिव संचालकांच्या बैठका घेतात, संचालक उपसंचालकांच्या.. याप्रमाणे बैठकांची मालिका खाली थेट शिक्षकापर्यंत येते आणि प्रत्येक विषयाचे नवे नवे कागद फिरत राहतात.

वेळ आणि खर्च वाचवण्यासाठी सुरू झालेली व्हीसी ही सुविधा आता सर्वांत मोठी असुविधा बनली आहे. कधी कधी दिवसाला ३ ते ४ व्हीसी असतात. परिणामी अधिकारी कार्यालयातच अडकून राहिल्याने शाळा भेटी थांबल्या आहेत. त्यामुळे महिन्याच्या सुरूवातीचे आणि शेवटचे तीन दिवसच शिक्षण विभागात बैठका होतील आणि मधल्या काळात सचिव ते केंद्रप्रमुख फक्त शाळांना भेटी देतील, असे स्पष्ट निर्देश दिले पाहिजेत.

सध्या एकीकडे बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत आणि राज्यात सर्वत्र शिक्षकांचे प्रशिक्षणही सुरू आहे. यात विद्यार्थ्यांचे



नुकसान होत असताना केवळ ह्यमार्च एन्डह्व आल्याने खर्च पूर्ण करण्यासाठी हा प्रकार सुरू आहे का, असा प्रश्न पडतो. वास्तविक मे महिन्याच्या सुटीत असे प्रशिक्षण घेण्यास अडचण असणार नाही. त्यात विद्यार्थ्यांचे नुकसानही होणार नाही. पण, अशैक्षणिक कामात वेळ जातो, अशी ओरड करणाऱ्या शिक्षक संघटना सुटीत

हेरंब कुलकर्णी

बोलावले तरीही ओरड करतात, हेही तितकेच खरे.

या स्थितीमुळे बैठका, प्रशिक्षण सत्रे नियंत्रित होण्याची गरज आहे. अनेकदा विविध उपक्रम आणि स्पर्धांमध्ये वेळ जातो. महावाचन उपक्रमात विद्यार्थ्यांनी वाचन करून अभिप्राय द्यायचा होता.

यामध्ये निवडक विद्यार्थ्यांचे अभिप्राय घेणे समजू शकतो; पण शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला तो देणे बंधनकारक करण्यात आले. शाळेत हजार विद्यार्थी असतील, तर त्या प्रत्येकाचा अभिप्राय अपलोड करायला लावण्यात आला.

केंद्र सरकारच्या परीक्षा पे चर्चापासून ते गावच्या ग्रामपंचायतीपर्यंतच्या सर्व उपक्रमात शिक्षकांना भाग घ्यावा लागतो. शिक्षण विभाग क्रीडा स्पर्धा, चित्रकला, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करतो.

वास्तविक शालेय स्तरावर होऊ शकणाऱ्या अशा स्पर्धा शासनाने घेण्याची गरज नाही. शालेय पोषण आहार शिजवणे आणि त्याचा हिशेब ठेवणे यातही शिक्षकांचा खूप वेळ जातो.

तथापि, अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांना लिहिता-वाचता येत नाही, हा शिक्षकांचा बचाव फसवा आहे. काम न करणारे ही ढाल वापरतात. या कामांमुळे मुले लिहीत-वाचत नसतील, तर राज्यातील सगळेच विद्यार्थी अप्रगत असायला हवे होते. पण, गुणवत्तेत अव्वल असणाऱ्या राज्यातील अनेक शाळा ही कामे करूनही गुणवत्ता कशी आणतात?

वर्षात ८०० तास शाळा चालते. चौथीपर्यंत विद्यार्थी ३२०० तास शाळेत असतो. त्यातील अगदी ५०० तास अशैक्षणिक कामात गेले, तरी वाचन - लेखन, गणित शिकवायला २७०० तास कमी आहेत का? तेव्हा वाचन - लेखन सरावासाठी असे शिक्षक वेळ देत नाहीत किंवा ते शिकवण्याचे कौशल्य त्यांच्यात कमी आहे, हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

शाळेच्या वेळेत मोबाइल वापरण्यामुळे शिक्षकांचा जाणारा वेळ, हाही आज चिंतेचा विषय बनला आहे. आणि गुणवत्तेसाठी वेळ कमी पडत असेल, तर शिक्षण कायद्यानुसार आठवड्याला ३० तास अध्यापन आणि १५ तास अध्यापन पूर्वतयारी असा वेळ देणे अपेक्षित आहे. शिक्षक रोज २ तास या पूर्वतयारीसाठी शाळेत लवकर गेले, तर अशैक्षणिक कामांची तक्रार करण्याची वेळच येणार नाही.

गुणवत्तेसाठी अशैक्षणिक कामे बंद करून हा पूर्वतयारीचा वेळ शाळेत वापरण्याची आवश्यकता आहे.

**माहिती देण्याचा महाउद्योग**

शिक्षकांचा बराचसा वेळ मागवलेली ह्यमाहितीह्व पुरवण्यात जातो. व्हाट्स ॲपमुळे तर आता माहिती मागवणे अधिक सोपे झाले. व्हाट्स ॲपवर दिवसभर अनेक पत्रं पडत असतात आणि प्रत्येकावर तत्काळ हा शेरा असतो.

विविध शिष्यवृत्ती, आर्थिक नियोजनाचे हिशेब यासाठी माहिती मागवणे गरजेचे असले, तरी अधिकाऱ्यांनी जून ते एप्रिल महिन्यात पाच तालुके निवडून वर्षभरात आपण तिथून किती माहिती मागवली, हे एकदा तपासावे आणि गरज नसताना कोणती माहिती मागवली, शासनाकडे असलेलीच माहिती किती वेळा मागवली, याचे वर्गीकरण करावे.

केंद्रात, तालुका किंवा जिल्हा कार्यालयात उपलब्ध असलेली कोणती माहिती विनाकारण शाळेकडून मागवली, हेही बघायला हवे. तसे झाले तरच वारंवार माहिती मागवण्याचे प्रकार कमी होतील. खरे तर अशा कामांसाठी एखादे सॉफ्टवेअर विकसित केले, तर त्यामुळे बरीच सुलभता येईल.

■ ■ ■

# प्रेमासाठी सारे काही...

## भ्रमंती लाईव्ह स्टोरी



संदीप काळे

sandip98868@gmail.com

9890098868

संत एम.मुळे वृंदावनचा फार जवळून संबंध आला. अनेक वेळा, अनेक दिवस वृंदावनला राहता आले. श्री. एम.मुळेच खूप सारे मित्र मिळाले. त्या मित्रांमध्ये वृंदावनमध्ये राहणारे राजेश तिवारी यांची खूप छान मैत्री झाली. अनेक वेळा त्यांच्यासोबत राहून तिवारी यांच्या नजरेने वृंदावन पाहिले. कृष्णभक्ती, अद्वितीय प्रेम आणि वृंदावन हा माणसाने एकदा तरी अनुभवावा असा अनोखा संगम आहे. त्या दिवशी राजेश यांचा फोन आला आणि मला म्हणाला, 'संदीप, माझे लग्न ठरले आहे. तुला यायचे आहे'. मला राजेशच्या लग्नाला जाणे गरजेचे होते. कारण राजेशचे लग्न आमच्या सर्वांची मैत्रीण यूएसची श्रीकृष्णभक्त रुसीसोबत होणार होते. रुसीने पाच वर्षांपासून वृंदावनात श्रीकृष्ण भक्तीमध्ये स्वतःला समर्पित केले आहे.

रुसी आणि राजेशच्या लग्नाला वृंदावनात गेलो. दोन दिवस वृंदावनला मुक्काम होता. वृंदावनात फिरणे, तिथल्या माणसांशी बोलणे, यात जो आनंद मिळतो, तो अन्य कशातच नाही. लग्न लागल्यावर वृंदावनला फिरण्यासाठी बाहेर पडलो. वृंदावनात प्रत्येक वेळी नवीन काहीतरी अनुभव मिळतो. मंदिर परिक्रमा हा माझा आवडता विषय.

मजल दरमजल माझा प्रवास सुरू होता. प्रेम- मंदिरापासून थोडे दूर गेल्यावर जप करत बसलेले एक जोडपे दिसले. दोघांचे लांब केस, दोघांमध्ये एक आसन, एकच पाण्याची बाटली, एकच बॅग, सारे काही दोघांत एकच होते. ते मी पाहिल्यावर माझ्या लक्षात आले की हे एक जोडपे आहे. त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज पाहून मला वाटले, आपण यांच्याशी बोलले पाहिजे. मी त्यांच्या अवतीभोवती घुटमळत होतो. आत्ता जागे होतील, नंतर जागे होतील, याची मी वाट पाहत होतो. खूप वेळ झाला, पण ते काही त्यांच्या साधनेतून बाहेर यायला तयार नव्हते. मी तिथून निघणार, इतक्यात ते दोघेही जागे झाले.

मी त्यांना नमस्कार केला. त्यांना मी म्हणालो, 'तुमच्याशी काहीतरी बोलायचं होतं, म्हणून ब-याच वेळापासून थांबलो आहे'. त्या दोघांनी आश्चर्याने एकमेकांकडे पाहिले. त्यातली महिला मला म्हणाली, 'सांगा ना काय बोलायचं आहे तुम्हाला? 'तुम्ही जी साधना करताय, तुम्ही जी ध्यानधारणा करताय, त्यातून तुम्हाला खरंच ईश्वराची भेट होते का? या साधनेने तुम्हाला समाधान मिळते का? का तुम्ही अन्य कुठल्या कारणास्तव ध्यानधारणा करताय?' त्या दोघांनीही एकमेकांकडे पाहत आणि स्मितहास्य करत मला उत्तर दिलं. त्या जोडीमधला तो पुरुष मला म्हणाला, 'अहो, प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक गोष्टीत ईश्वर आहेच. तुम्ही ध्यानधारणा करा, तपस्या करा अथवा करू नका. त्याची आणि तुमची भेट होतच असते. मन एकाग्र ठेवून श्रीकृष्णाला भेटण्याची आस ठेवली, तर तो भेटतोच भेटतो'.

मग काय मी प्रश्न विचारत गेलो आणि ते उत्तर देत गेले. ते कुठे राहतात, ते काय करतात, ते कधीपासून साधू बनलेत, इथपासून ते त्यांचं पूवार्युष्य मी त्यांच्याकडून जाणून घेत होतो. आयुष्याच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर आल्यावर त्या दोघांनी साधूच्या वेशात राहणं पसंत केले. ते दोघेही आयटी इंजिनियर साधू का बनले? त्या दोघांची खूप करुण कहाणी मी ऐकली आणि माझं मन एकदम सुन्न झालं.

प्रेमिला शर्मा आणि सिद्धार्थ अवस्थी हे दोघेही अगदी जवळचे नातलग. लहानाचे मोठे ते उत्तर प्रदेशात झाले. उच्च शिक्षणासाठी मुंबईला गेले. तिथून दोघेही आयटी इंजिनियर झाले. दोघेही मुंबईत काम करू लागले. एकमेकांची ओळख होती. त्या ओळखीतून दोघांचे प्रेम झाले आणि ते प्रेम लग्नाजवळ येऊन थांबले.

प्रेमिलाला वडील नाहीत. प्रेमिलाची आई तिच्या एका बहिणीला घेऊन उत्तर प्रदेशात राहते. प्रेमिलाने जेव्हा सिद्धार्थचा विषय तिच्या आईला सांगितला, तेव्हा प्रेमिलाच्या आईच्या तळपायाची आग मस्तकात गेली. प्रेमिलाचा लग्नाविषयीचा निर्णय आईला अजिबात मान्य नव्हता. ज्या दिवशी प्रेमिलाने आईला लग्नाचा विषय सांगितला, त्याच्या दुस?्या दिवशी आईने उत्तर प्रदेशातून निघून थेट मुंबई गाठली. प्रेमिलाला पकडून तिने गावाकडे आणले.

तिच्या लग्नाची इतर ठिकाणी बोलणी सुरू झाली. प्रेमिलाला तर सिद्धार्थबरोबरच लग्न करायचे होते. आईच्या ठाम नकारामुळे ते लग्न होणार नाही, हे निश्चित होते. प्रेमिलाने घरातल्या घरात दोन वेळा आत्महत्येचा प्रयत्न केला, तरीही तिची आई तिचे ऐकायला तयार नव्हती.

एकदा भांडणांत बोलता बोलता आई प्रेमिलाला म्हणाली, 'तू कुठेतरी एखाद्या मंदिरावर साध्वी म्हणून जा, पण मी त्या मुलासोबत तुझे लग्न करू शकत नाही. तो माझ्या अशा नात्यातला आहे की, त्या नात्यांत तुमच्या दोघांचं नातं नवरा-बायकोचं होऊच शकत नाही. बहीण-भावाचे होते. तुम्ही लग्न केलं, तर मी लोकांना काय तोंड दाखवू? समाजात माझी इज्जत राहणार नाही. तुज्या लग्नाला कोणी येणार नाही.

तुझ्या बहिणीचं लग्न होणार नाही. त्यावर प्रेमिला म्हणाली, 'ठीक आहे. मी मंदिरात साध्वी म्हणून राहते'. प्रेमिलाच्या आईला वाटले, प्रेमात पडलेली ही तरुण मुलगी थोडीच मंदिरात साध्वी म्हणून राहणार आहे? एकीकडे प्रेमिलाची आई तिचं लग्न कुठं जमेल का, या विवंचनेत होती, तर दुसरीकडे प्रेमिला साध्वी बनण्यासाठी दीक्षा कुठे घ्यायची? त्याची काय काय नियमावली असते? कोणाकडे जावे लागते? याची सगळी माहिती काढून ठेवत होती.

एके दिवशी प्रेमिलाने तिच्या आईला सांगितले की, मी आता साध्वी म्हणून मंदिरामध्ये बसणार आहे. प्रेमिलाच्या आईला प्रेमिलाचा निर्णय ऐकून एकदम धक्काच बसला, पण प्रेमिला तिच्या निर्णयावर ठाम होती. आत्महत्या, सामाजिक प्रतिष्ठा, आईचे मत, नातेवाईकांचे मत, सिद्धार्थला धोका या सगळ्या शक्यतांवर मात करायची असेल तर, आईने रागात का होईना मला सुचवलेला साध्वी बनण्याचा पर्याय जिवंत राहण्यासाठी योग्य मार्ग ठरू शकतो. त्यातून मला आवडणाऱ्या श्रीकृष्णाची भक्ती करता येईल. सिद्धार्थच्या प्रेमाचे पावित्र्यही मला जपता येईल, या भावनेतून प्रेमिलाने साध्वी बनण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानंतरही प्रेमिलाची आई 'मी सिद्धार्थशी लग्न लावणार नाही', या मतावर ठाम होती.

प्रेमिलाला मुंबईवरून गावी नेताना प्रेमिलाची आई तिला सोबत घेऊनच सिद्धार्थला भेटली. तिने सिद्धार्थला तंबी देत मारहाण केली आणि बजावून सांगितलं की, माझ्या मुलीला मी विहिरीत ढकलून देईन, पण तुज्यासोबत तिचं लग्न करणार नाही. तुज्या आईवडलांनी गावाकडे काय प्रताप केलेत, हे माहिती आहे ना? तुझे आणि हिचे नाते काय आहे हे माहिती आहे ना? यानंतर प्रेमिलाशी बोलायचा किंवा भेटायचा प्रयत्न केलास, तर मी तिचा मुडदा पाडेन. मीही आत्महत्या करीन आणि त्याची सगळी जबाबदारी तुझ्यावर असेल'.

सिद्धार्थला वाटलं, काहीही झालं, तरी प्रेमिलावरचं आपलं प्रेम कमी होणार नाही. तिच्याशिवाय आपण इतर कोणावर प्रेम करू शकत नाही. तिच्यासोबत लग्न करू शकत नाही. ती जिथे कुठे असेल तिथे सुखी राहावी, या भावनेतून मोठ्या जड अंतःकरणाने सिद्धार्थने प्रेमिलाला समंजसपणे निरोप दिला. तिकडे वृंदावनमध्ये जाऊन प्रेमिला साध्वी बनली. सिद्धार्थच्या प्रेमाचं पावित्र्य राखण्यासाठी तिनं हा निर्णय घेतला होता. ही गोष्ट प्रेमिलाच्या मैत्रिणीकडून बऱ्याच दिवसांनी सिद्धार्थला कळली.

सिद्धार्थने खूप शोध घेतल्यावर त्याला प्रेमिला भेटली, ती साध्वीच्या वेशात. घडलेला सगळा प्रकार तिने सांगितला. 'तू तुझे आयुष्य आनंदाने जग. आता मी हा निर्णय कायम ठेवून आयुष्यभर श्रीकृष्णाचं ध्यान करत या वृंदावनमध्येच राहणार आहे', असं प्रेमिलानं सिद्धार्थला सांगितलं.

सिद्धार्थ प्रेमिलाला म्हणाला, 'माझ्या आयुष्याला तुज्याशिवाय काहीच अर्थ नाही. आपलं प्रेम काही विसरून जाण्यासाठी नव्हतं किंवा काहीतरी मिळवण्यासाठीही नव्हतं. आपलं प्रेम हे जन्मोजन्मीच्या गाठी आयुष्यभर कायम राहाव्यात यासाठी झालं होतं. तू जो साध्वी बनण्याचा निर्णय घेतलेला आहेस, तसाच मीही साधू बनण्याचा निर्णय घेतो. साधू आणि साध्वी बनून आपण श्रीकृष्णाची भक्ती करत राहू. नवरा-बायको होऊ शकलो नाही तर काय झाले? श्रीकृष्णाचे भक्त म्हणून सोबत राहू. दोन-चार दिवस प्रेमिलाने सिद्धार्थची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण सिद्धार्थ काही ऐकायला तयार नव्हता.

शेवटी सिद्धार्थने साधू बनण्याचा निर्णय घेतला आणि गेल्या चार वर्षांपासून हे दोघे जण साधू-साध्वी बनून वृंदावनमध्ये तपस्या करत असतात. चार ठिकाणी भिक्षा मागतात. पोटापुरतं जेवढं मिळेल तेवढं खातात. रात्री वृंदावनच्या श्रीकृष्ण आश्रमात मुक्काम करतात. साधू आणि साध्वीचे पावित्र्य त्या दोघांनीही जपले आहे.

प्रेमिला म्हणाली, 'मी लहानपणापासून कृष्णभक्त आहे. श्रीकृष्णच आपल्यासाठी सर्व काही आहे, या भावनेने मी आयुष्याची बावीस वर्षे काढली. अपघाताने का होईना मी पूर्णवेळ कृष्णभक्त होईन, असं कधी वाटलं नव्हतं. मी सिद्धार्थमध्येसुद्धा श्रीकृष्ण पाहायचे. सिद्धार्थच्या मला जपण्याच्या पद्धतीत मला श्रीकृष्ण दिसायचे. दुर्दैवाने सिद्धार्थ माझा होऊ शकला नाही, पण माझी श्रीकृष्णभक्ती सिद्धार्थच्या सहवासाने आणि माझ्या समर्पणाने कायम राहिली.

सिद्धार्थ म्हणाला, 'अहो, जगण्यासाठी लागते तरी काय? सगळ्यात महत्त्वाचं, तुम्ही आनंदी आहात का? तुम्ही सुखी आहात का? हे खूप महत्त्वाचे आहे. मी आयटी इंजिनियर होतो. ती आयटी इंजिनिअर होती. आमच्या आयुष्याचे अंतिम ध्येय काय होतं? ते एकमेकांसोबत खूश राहायचं. मुंबईत राहिलो असतो, तर मोठ्या इमारतीमध्ये राहिलो असतो. आलिशान गाडीत फिरलो असतो. त्या सर्वांतसुद्धा सुख शोधणे हेच महत्त्वाचे ध्येय राहिले असते. इथे श्रीकृष्णाच्या सेवेमध्ये सुख शोधायची गरजच भासत नाही.

सुख हे आपोआपच मिळत जाते. माझे आणि प्रेमिलाचे प्रेम हे तेव्हाही होते, आताही आहे. तेव्हा त्या प्रेमात चांगुलपणाच्या आणाभाका घेत आकाशाला गवसणी घालणारे भौतिक सुखाचे स्वप्न पाहिले होते. आता त्या आणाभाका कायम आहेत. फरक इतकाच की, आता श्रीकृष्णाच्या भक्तीत विलीन होण्याचे स्वप्न उराशी बाळगून मार्गाने वाटचाल सुरू आहे'.

ते दोघेजण माझ्याशी बोलत असताना मी विचारले, 'तुमच्या नातेवाईकांचे काय झाले? सिद्धार्थच्या घरच्यांनी विरोध केला नाही का?' प्रेमिला म्हणाली, 'जसं माज्याकडे झालं, तसं त्याच्याकडेही झालं'. डोळ्यात अश्रू आणत, प्रेमीला म्हणाली, 'एका वर्षानंतर माझी आई वारली.

बहिणीची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली. आईकडे फार काही नव्हतं. जे काही होतं, ते मी विकलं आणि आनंदात बहिणीचं लग्न केलं. सिद्धार्थला आई-वडील नव्हते. त्यानं त्याच्या मोठ्या भावाच्या नावावर त्याची सगळी मालमत्ता करून दिली आणि अगदी सहजतेनं, आनंदात माज्यासोबत येऊन भगवे वस्त्र परिधान केले'.

मी त्या दोघांनाही अजून एक प्रश्न विचारला, 'तुम्ही हे सगळं आपल्या प्रेमासाठी केलं का श्रीकृष्णासाठी?' त्या दोघांचेही उत्तर अतिशय समर्पक होते. ते म्हणाले, 'आम्ही जगत होतो श्रीकृष्णासाठी. आमचं प्रेमही श्रीकृष्णासारखं होतं आणि आम्ही आताही जे काही करतो ते श्रीकृष्णासारखं आणि श्रीकृष्णासाठीच करतो'.

सिद्धार्थ आणि प्रेमिला या दोघांचाही खूप छळ झाला होता. नियतीने आणि नातेवाईकांनी त्यांच्या अनेक प्रकारे परीक्षा पाहिल्या होत्या. त्या सगळ्या परीक्षांमध्ये सफल होता होता त्या दोघांनी प्रेमासाठी जे काही केलं ते अतुलनीय असंच होतं. मी त्या दोघांचा निरोप घेऊन निघालो. निघताना माझ्या मनात एकच प्रश्न होता की, अजूनही किती सामाजिक प्रतिष्ठेच्या रेखा प्रेमाच्या आड येतील? त्यातून जे घडते, त्याचा आपण विचारही करू शकत नाही. तुमच्या अवतीभोवती असेच प्रेम करणारी अनेक जोडपी असतील. त्यांचे प्रेम अगदी राधा-मीरा श्रीकृष्णासारखं असेल. अशा जोडप्यांना सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी आपण निश्चितपणे मदत करणार ना?

■ ■ ■ ■

# समस्या निरक्षरता हीच समस्या!

आपल्यावर समस्या निरक्षरतेचा फार मोठा पगडा आहे. त्यामुळे पुढची वाटचाल करताना समस्यांचे आकलन होणे, ही पहिली आणि महत्त्वाची पायरी आहे. एकविसाव्या शतकातील पंचविसाव्या वर्षाच्या टप्प्यावरुन पुढच्या पंचवीस वर्षांकडे पाहताना, आपली दृष्टी आणि दिशा नेमकी काय असावी? एकविसाव्या शतकाची पहिली पंचवीस वर्षे संपत आली असून, पुढच्या २५ वर्षांकडे म्हणजेच २०५० कडे जगाची वाटचाल सुरू आहे. मानवाचा या पृथ्वीवरचा इतिहास तसे पाहता सुमारे ७० हजार वर्षांचा आहे. त्याआधी तो एक प्राणी म्हणून इतर जीवसृष्टीच्या सर्वसाधारण घटकाच्या रुपात अस्तित्वात होता. पण, पुढे त्याने आहे त्याच स्थितीत राहण्याच्या इतर प्राणिमात्रांच्या तत्त्वापासून फारकत घेतली आणि निसर्गावर मात करून आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला. उत्तरोत्तर प्रगल्भ होत जाणा?्या बुद्धिमत्तेमुळे त्याने मानवी संस्कृती निर्माण केली आणि तो आजपावेतो ती विकसित करीत राहिला आहे.

महेश झगडे

या इतिहासात जाण्याची गरज नाही, कारण तो आपल्याला ज्ञात आहे. पण, त्यानंतरची स्थित्यंतरे लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या दहा-बारा हजार वर्षांपूर्वी माणसाची जंगलातील भटकंती संपली आणि त्याने शेती करून एके ठिकाणी वास्तव्य करण्यास सुरूवात केली. त्यामुळे पुढे अर्थ आणि प्रशासकीय व्यवस्थेची गरज निर्माण होऊन त्या व्यवस्था उत्तरोत्तर विकसित होत गेल्या. आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे, जे पूर्वी ६५-७० हजार वर्षांत घडले नाही, ते गेल्या अडीचशे वर्षांत घडले. म्हणजेच १७७६ मध्ये पहिल्या औद्योगिक क्रांतीची सुरूवात होऊन आतापर्यंत त्या क्रांतीचे तीन अध्याय झाले आणि आता २०११ पासून चौथ्या औद्योगिक क्रांतीचा नवा अध्याय सुरू झाला आहे.

हे जे घडले त्यातून या पृथ्वीतलावर विस्मयकारक असा बदल झाला. या अडीचशे वर्षांत जगाचा चेहरामोहरा, चलनवलन पूर्णपणे बदलून गेले. बदलाच्या या वेगाचे एक टर्बो-वेग असे वर्णन करणे योग्य ठरेल.

उदाहरणच द्यायचे, तर लोकसंख्येचे देता येईल. जगाची लोकसंख्या १०० कोटी होण्यास दोन लाख वर्षे लागली. पण, सन १८०० मधील शंभर कोटी लोकसंख्या पुढील केवळ २०० वर्षांत आठ पटीने वाढून आता ८०० कोटींवर गेली आहे. लोकसंख्या वाढीचा हा वेग विचार करण्यापलीकडचा आहे. मानवाच्या बाबतीत घडणाऱ्या बदलाच्या या वेगावर आणखी एक संख्या प्रकाश टाकू शकते. सन १८०० पर्यंत ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर होऊन केवळ तीन टक्के लोक शहरांमध्ये राहात होते. पण, नंतरच्या जेमतेम सव्वादोनशे वर्षांत शहरी भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण ५८ टक्क्यांवर गेले आहे.

एकंदरीतच गेल्या दोनशे-सव्वादोनशे वर्षांत मानवाच्या बाबतीत जे बदल घडत गेले ते प्रचंड मोठे आहेत. पण, यापुढे हे बदल सुपर-टर्बो वेगाने म्हणजेच अतिअति वेगवानह्व असे होतील आणि ते कल्पनेच्या पलीकडचे असतील. या अफाट गतीमुळे मानवी जीवन केवळ ढवळूनच निघणार नाही, तर मानव प्रजातीची पुढे नव्या प्रजातीमध्ये उत्क्रांती होऊ शकते, असे भाकित केले जात आहे. बदलांची ही गती आता कोणीही थांबवू शकत नाही किंवा थांबवायची झालीच, तर ते आता कोणाच्या हातातही राहिलेले नाही.

तथापि, त्या स्थिती-गतीला मानवी समुदाय पोहोचेपर्यंतच्या अवस्थेत म्हणजे या वर्तमानात जे काही घडत आहे आणि नजीकच्या २५ वर्षांच्या भविष्यात जे घडू शकेल, त्यावर विचारमंथन व्हायला हवे. त्यातही आपल्या देशात आणि राज्यात या बदलांचे काय परिणाम दिसू शकतील? अशा परिणामांमुळे नागरिकांना प्रचंड मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागू नये, यासाठी काही विशेष सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, आर्थिक धोरणे असावीत का? यांवर सखोल चिंतन होणे अत्यावश्यक आहे.

अन्यथा, सध्याच्या प्रतिक्रियाशील संस्कृतीमुळे, म्हणजेच काही घडल्यानंतरच त्यावर उपाययोजना करण्याच्या पद्धतीमुळे या समस्या इतके गंभीर स्वरूप धारण करू शकतील की त्यावर उपाय करणेही दुरापास्त होईल. त्यासाठी पुढच्या पंचवीस वर्षांत, आपल्या राज्याची आणि देशाची वाटचाल कशी असावी, यासाठी प्रत्येक नागरिक, विचारवंत, शासनकर्ते आदींनी विचारमंथन करून एक दिशा निश्चित केली पाहिजे.

त्यानुसारच आपली धोरणे, कार्यप्रणाली, अर्थव्यवस्था, सामाजिक व्यवस्था यांबाबतीत सखोलपणे निर्णय घेऊन कार्यवाही करणे दूरदृष्टीचे ठरेल. तसे सध्या होत आहे का? मला तरी तसे वाटत नाही. या समस्यांची एकत्रित जंत्री तयार करून सरकारने तसा अजेंडा समाज, राज्य आणि देशासमोर आणला आहे का? की आजचा दिवस ढकलला या स्वरूपातच आपली वाटचाल सुरू आहे?

याबाबतीत सर्वांत प्रथम येणारा आणि कळीचा मुद्दा म्हणजे, सध्याच्या आणि भविष्यात वाढून ठेवलेल्या समस्यांबाबत समाज, शासनव्यवस्था आणि विचारवंत खरोखरच संवेदनक्षम आहेत का? आणि त्या समस्यांच्या तीव्रतेनुसार त्यांचा प्राधान्यक्रम ठरवला आहे का? मात्र, तसे होताना दिसत नाही. पण, हे करणे यासाठी गरजेचे आहे की, जसे रुग्णाच्या रोगाचे निदान होत नाही, तोवर त्याच्यावरचे उपचार निरर्थक ठरतात, तसे मूळ समस्याच आपल्याला माहीत नसतील, तर उपाययोजना काय आणि कशा करणार?

आज आणि पुढच्या पंचवीस वर्षांत देशापुढे, राज्यापुढे काय समस्या उद्भवू शकतात, हे व्यवस्थेने जनतेला सांगितले पाहिजे आणि त्यांना तोंड देण्याची काय तजवीज ठेवली आहे, हे शासनाने लोकांसमोर आणले पाहिजे. देशाच्या आणि राज्याच्या समोर असलेल्या समस्यांच्या तीव्रतेनुसार त्यांची उतरत्या क्रमाने मांडणी करण्याचे आवाहन मी काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवरुन केले होते.

त्या अनुभवावरून आणि एकंदरीत समाजात जे काही चालले आहे, त्यावरून मला एक गोष्ट स्पष्टपणे जाणवली की, आपल्यावर समस्या निरक्षरतेचा फार मोठा पगडा आहे. अद्यापही आपण समस्या साक्षर झालेलो नाही. आपण सुशिक्षित झालो, पण एक समाजसमूह म्हणून समस्यांबाबत पूर्णपणे अनभिज्ञता आहे आणि हीच ती समस्या निरक्षरता. त्यामुळे पुढच्या पंचवीस वर्षांची वाटचाल करताना समस्यांचे आकलन होणे, ही पहिली आणि महत्त्वाची पायरी आहे.

शासनव्यवस्था, त्यांची ध्येयधोरणे, मंत्रिमंडळाचे आणि कायदेमंडळाचे निर्णय, बजेट, राजकीय पक्षांचे जाहीरनामे आणि विशेषतः राजकीय पक्षांच्या भूमिकेवरून खऱ्याखुऱ्या समस्यांची किंवा प्रश्नांची जाणीव यांपासून आपण भरकटलो आहोत, असे वाटाण्यासारखी स्थिती आहे.

मुळातच समस्या नसलेल्या अशा विषयांना समस्या म्हणून कृत्रिमपणे उभे करून आणि त्यांना भावनिकतेचा मुलामा देऊन स्वार्थ साधण्याचे हे युग आहे. हीच बाब खासगी क्षेत्रालाही लागू पडते. त्यामुळे प्रथमतः समाजापुढे, राज्यापुढे, देशापुढे नेमक्या काय समस्या आहेत, त्या अधोरेखित केल्या नाहीत, तर त्यावर तोडगा निघूच शकणार नाही!

पृथ्वीतलावरील स्थित्यंतराचा वेग अत्यंत धोकादायक वळणावर येऊन पोहोचला आहे. आणि त्यातही पुढची २५ वर्षे अत्यंत महत्त्वाची ठरणार आहेत. त्यामुळे जगाच्या, देशाच्या आणि राज्याच्या पातळीवर काय समस्या उद्भवणार आहेत आणि त्यांना सामूहिकरित्या कसे तोंड द्यायचे, याचा विचार करावाच लागणार आहे.

■ ■ ■



## देबजींना निरोप

अलिकडेच चित्रपटसृष्टीतून आलेली एक वाईट बातमी आपण ऐकली. काजोल आणि राणी मुखर्जी यांचे काका आणि प्रसिद्ध दिग्दर्शक अयान मुखर्जी यांचे वडील ज्येष्ठ अभिनेते देब मुखर्जी आता या जगात नाहीत. त्यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले. या अभिनेत्याच्या निधनाने त्यांच्या कुटुंबाबरोबरच चित्रपटसृष्टीलाही मोठा धक्का बसला.



देब मुखर्जी काजोल आणि राणी मुखर्जी यांच्या खूप जवळ होते खेरीज ते आशुतोष गोवारीकर यांचे सासरे देखील होते. काका देब मुखर्जी यांच्या निधनानंतर काजोल आठवणींमध्ये हरवलेली दिसली. तिने आपल्या पोस्टमध्ये दु:ख व्यक्त केले. त्यात ती म्हणते, 'आता मी त्याच्याशिवाय जुळवून घेण्याचा प्रयत्न करत आहे....' देब मुखर्जी हे प्रसिद्ध समर्थ-मुखर्जी कुटुंबातील होते. ६० च्या दशकात 'तू ही मेरी जिंदगी' आणि 'अभिनेत्री' सारख्या चित्रपटांमध्ये छोट्या भूमिकांद्वारे त्यांनी कारकिर्दीची सुरुवात केली. यानंतर ते 'दो आँखें' आणि 'बातों बातों में' सारख्या मोठ्या चित्रपटांमध्येही दिसले. कारकिर्दीत नंतर त्यांनी 'जो जीता वही सिकंदर' आणि 'किंग अंकल' सारख्या चित्रपटांमध्ये सहाय्यक भूमिका केल्या. २००९ मध्ये विशाल भारद्वाज यांच्या 'कमीने' या चित्रपटात ते छोट्या भूमिकेत दिसले होते. हाच त्यांचा अखेरचा चित्रपट ठरला. देब मुखर्जी यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



## ...तरीही जॉनने लक्ष वेधले

बॉलीवूड अभिनेता जॉन अब्राहम दमदार अभिनयामुळे चाहत्यांच्या मनावर राज्य करतो. अलिकडेच त्याचा 'द डिप्लोमॅट' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला परंतु चित्रपटाला कोणताही मोठा व्यावसायिक फायदा झाल्याचे दिसले नाही. तथापि, चित्रपटात या अभिनेत्याच्या कामाचे मात्र खूप कौतुक झाले आहे. जॉन अब्राहमचा नुकताच प्रदर्शित झालेला हा चित्रपट आयएफएस अधिकारी जे. पी. सिंग यांच्या कथेवर आधारित एक राजकीय नाट्यमय चित्रपट आहे. यातील प्रमुख पात्राने तत्कालीन परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांच्या मदतीने पाकिस्तानातून एका मुलीला भारतात आणण्याचा प्रयत्न केला होता. हा चित्रपट विकी कौशलच्या 'छावा'शी स्पर्धा करेल, असे सांगितले जात होते. मात्र तसे काही घडताना दिसले नाही. जॉनच्या या चित्रपटाने पहिले तीन दिवस चांगला गल्ला जमवला मात्र चौथ्या दिवसापासून कमाईचा आलेख झपाट्याने खाली येत गेला. या चित्रपटाने आतापर्यंत १.५० कोटी रुपये कमावले आहेत. आता येत्या काळात जॉन अब्राहमच्या चित्रपटाचे कलेक्शन वाढते की नाही हे पाहणे रंजक ठरेल.



## अल्लू अर्जुनची हवा

बॉक्स ऑफिसवर 'पुष्पा २' सारखा ब्लॉकबस्टर चित्रपट दिल्यानंतर अल्लू अर्जुनचा चित्रपट उद्योगात मोठा प्रभाव पडला आहे. अभिनेत्याच्या आगामी चित्रपटाची सर्वांनाच उत्सुकता आहे. आता अल्लू थेट दिग्दर्शक सुकुमार यांच्या 'पुष्पा ३ द रॅम्पेज' मध्येच दिसणार असल्याचे अनेकांचे मत होते. पण 'पुष्पा ३' च्या आधी अल्लू अर्जुनचे दोन नवीन चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होतील. त्यात 'जवान' सारखे मेगा ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे दिग्दर्शक ॲटली यांच्यासोबत शाहरुख खान एका नवीन चित्रपटाची तयारी करत असल्याची बातमी आहे. कदाचित त्यामध्ये अल्लू अर्जुन दिसू शकतो. म्हणजेच पठाणच्या सिक्वेलमध्ये अल्लू खलनायकाच्या भूमिकेत दिसू शकतो. हे खरोखर घडले तर चित्रपट प्रेमींसाठी निश्चितच एक खास मेजवानी असेल. या चित्रपटाच्या शीर्षकाबाबत अद्याप कोणतीही पुष्टी झालेली नाही. पण ती लवकरच होईल. खेरीज निर्माते रवि शंकर यांनीही अल्लू अर्जुनच्या पुढील चित्रपटांबद्दलचे चित्र स्पष्ट केले आहे. एवढेच नाही तर ॲटलीच्या चित्रपटानंतर तो दक्षिणेतील चित्रपट निर्माते त्रिविक्रम श्रीनिवास यांच्या चित्रपटातही दिसणार आहे. अर्थात हा चित्रपट बनवण्यासाठी आणखी दोन वर्षे लागतील.

## 'आशी'ने आशा वाढवल्या

चित्रसृष्टीत पंकज त्रिपाठी या नावाची वेगळी ओळख आहे. उत्तम आणि दर्जेदार अभिनेता असणाऱ्या पंकज यांचे अनेक चाहते आहेत. मात्र त्यांची मुलगी आशी देखील कोणत्याही स्टारपेक्षा कमी नाही. तिचे सौंदर्य पाहणाऱ्याची नजर खिळवून ठेवणारे आहे. त्यामुळेच तीदेखील पित्याचा अभिनयाचा वारसा चालवेल, अशी चाहत्यांची अपेक्षा आहे. साधेपणाची आवड असणारी आशी आतापर्यंत अभिनय आणि पडद्यापासून दूर असली तरी ती सोशल मीडियावर सक्रिय आहे. आत्तापर्यंत पालकांसोबत सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये दिसायची तेव्हा सर्वांच्याच नजरा तिच्यावर खिळून असायच्या. मात्र आता ती मनोरंजनविश्वातील पदार्पणामुळे चर्चेत आहे. 'रंग दारो' या म्युझिक व्हिडिओद्वारे आशीने पडद्यावर पदार्पण केले आहे. हे गाणे अलिकडेच रिलीज झाले असून सर्वत्र चर्चेत आहे.

'रंग दारो' मध्ये आशी त्रिपाठी सुंदर दिसते. विशेषतः आशीच्या साधेपणाने लोकांना प्रभावित केले आहे. या गाण्यात तिच्याबरोबर प्रभाकर स्वामी आहे. हे गाणे मैनक भट्टाचार्य आणि संजना रामनारायण यांनी गायले असून अभिनव आर. कौशिक यांनी संगीत दिले आहे. व्हिडिओमध्ये आशीच्या अदाकारीचे कौतुक होत आहे.

प्रतिक्रिया देणाऱ्या एकाने 'किती सुंदर आहे ही, वाईट नजरेचा तिच्यावर परिणाम होऊ नये' असे लिहिले आहे तर दुसऱ्याने 'तिला वडिलांप्रमाणेच साधेपणा आवडतो असे दिसते. या साधेपणामुळे एकदिवस ती प्रख्यात अभिनेत्री होईल...' असे मत आणि शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. तेव्हा चित्रसृष्टीला लवकरच नवी आणि मोहक अभिनेत्री लाभण्याची शक्यता निर्माण झाली आहे, असे आपण म्हणू शकतो.




## म्हातारा इतुका ना...

प्रेमाला वय नसते असे म्हणतात. या वाक्यातील मर्म कोणाला पटत असेल तर तो आमिर खान आहे, असेच आता म्हणावे लागेल. कारण लग्नानंतर १६ वर्षांनी त्याने पहिली पत्नी रीना दत्ता हिच्याशी घटस्फोट घेतला. त्यानंतर किरण रावने त्याच्या आयुष्यात प्रवेश केला. 'दिल चाहता है' च्या सेटवर तो तिच्या प्रेमात पडला. मात्र नंतर तो तिच्यापासूनही वेगळा झाला. आता बॉलिवूडचा हा 'मिस्टर परफेक्शनिस्ट' वयाच्या ६० व्या वर्षी तिसऱ्यांदा प्रेमात पडला आहे. अलीकडेच 'पीके' च्या या अभिनेत्याने ६० व्या वाढदिवशी नवीन प्रेयसीची म्हणजेच गौरीची मीडियासमोर ओळख करून दिली. दरवर्षीप्रमाणे वाढदिवसाच्या निमित्ताने आमिर खानने मीडियाला मुंबईतील कार्टर रोड येथील निवासस्थानी आमंत्रित केले आणि त्यांच्यासमोर केक कापला. याच प्रसंगी त्याने आपल्या प्रेयसीची ओळख करून दिली तर गौरीनेही तिच्या मनातील गोष्टी उघडपणे सांगितल्या. मी अशाच व्यक्तीच्या शोधात होतो जी दयाळू आणि स्वच्छ हृदयाची आहे, काळजी घेणारी आहे असे त्याने गौरीकडे बघत स्पष्ट केले आणि तिच्यावरील प्रेमाची कबुली दिली. गौरी स्प्रेट ही आमिरची नवी प्रेयसी बंगळुरूमध्ये वाढली आहे. तुला वेगवेगळ्या प्रकारचे चित्रपट आणि कलांमध्ये रस आहे. मात्र असे असले तरी ती फारसे हिंदी चित्रपट पाहत नाही. हे स्पष्ट करताना आमिर खानने असेही सांगितले की, गौरीने कदाचित त्याचे कोणतेही चित्रपट पाहिले नसतील. यावर उत्तर देताना गौरीने लगेच आमिर खानला सांगितले की तिने त्याचे 'दिल चाहता है' आणि 'लगान' हे दोन्ही चित्रपट पाहिले आहेत. तथापि, गौरीने आपला 'तारे जमीन पर' चित्रपट अवश्य पहावा अशी इच्छा आमिरने यावेळी व्यक्त केली.



आमिर खान आणि गौरी जवळजवळ २५ वर्षांपासून एकमेकांना ओळखत असले तरी ते एकमेकांच्या फारसे संपर्कात नव्हते. मात्र दोन वर्षांपूर्वी काही कामानिमित्त ते एकमेकांना भेटले आणि चांगली मैत्री झाली. नंतर ते एकमेकांच्या प्रेमात पडले. गौरी आमिर खानच्या निर्मिती कंपनीत काम करते. आता हे दोघे कधी लग्नबंधनात अडकतात याची आमिरच्या चाहत्यांना उत्सुकता आहे.



## चर्चेतील 'कोटा फॅक्टरी'

राजस्थानमधील कोटा हे जेईई आणि नीट परीक्षांची तयारी करणाऱ्या कोचिंग सेंटर्सचे केंद्र असल्याचे म्हटले जाते. आपल्या मुलांना इंजिनिअर किंवा डॉक्टर बनवायचे असलेले पालक त्यांना कोटा येथे पाठवतात. इथे विद्यार्थी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिवसरात्र मेहनत करतात. या पार्श्वभूमीवर आधारित 'कोटा फॅक्टरी' सिरीज प्रवेश परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या दबावांची आणि समस्यांची कहाणी सांगते.

विद्यार्थ्यांच्या जीवनातील भावनिक आणि मानसिक पैलूंचे सखोल चित्रण करणारा 'कोटा फॅक्टरी' हा चित्रपट पहिल्यांदा २०१९ मध्ये प्रदर्शित झाला. नंतर तो टीव्हीएफ प्ले आणि यूट्यूबवर प्रदर्शित झाला. नंतर दुसरे आणि तिसरे सीझन नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाले. आता प्रेक्षक चौथ्या सीझनची वाट पाहत आहोत. हा सीझन पुढच्या वर्षी म्हणजे २०२६ मध्ये रिलीज होऊ शकतो. दुसऱ्या आणि तिसऱ्या सीझनप्रमाणे तो फक्त नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होईल.

तिसऱ्या सीझनच्या शेवटी वैभव त्याच्या आयआयटी परीक्षेत नापास होतो आणि त्याचा खोलवर परिणाम होतो हे दाखवले जाते. आता वैभवचे भविष्य आणि त्याचा पुढील प्रवास चौथ्या सीझनमध्ये दाखवला जाऊ शकतो. तो कोटामध्ये राहून पुन्हा प्रयत्न करतो की दुसरा मार्ग निवडतो हे चौथ्या सीझनमध्ये दिसून येईल. अर्थात निर्मात्यांनी रिलीज डेट किंवा कथेबद्दल कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. जितेंद्र कुमार यांनी या मालिकेत मुख्य भूमिका साकारली असून तो या मालिकेत एका शिक्षकाची भूमिका साकारत आहे. खेरीज मालिकेत रेवती पिल्लई, मयूर मोरे, रंजन राज आणि अहसास चन्ना यांच्याही भूमिका आहेत. चौथ्या सीझनच्या स्टारकास्टमध्ये बदल होणार आहे की नाही हे अधिकृत घोषणेनंतरच कळेल.

## 'सूरज' आता रुपेरी पडद्यावर

'बिग बॉस मराठी ५' च्या विनर ट्रॉफीवर सूरज चव्हाणने आपलं नाव कोरलं आणि चर्चेच्या केंद्रस्थानी आला. या शोद्वारे सूरजने लाखो चाहत्यांची मनं जिंकली असून आता तो पुन्हा एकदा जलवा दाखवायला सज्ज झाला आहे. केदार शिंदे दिग्दर्शित 'झापुक झुपूक'चा धमाकेदार टीझर रिलीज झाला असून त्यात सूरज भाव खाऊन जात असल्याचे दिसत आहे. लवकरच तो 'झापुक झुपूक' या त्याच्या पहिल्या मराठी सिनेमात दिसणार आहे. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत आणि केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित या चित्रपटाची प्रेक्षकांना प्रतीक्षा आहे.

सूरजचा यात एक प्रसिद्ध डायलॉग आहे. तो म्हणतो, 'मार्केट गाजवायला आणि पोरीला लाजवायला सूरज चव्हाणच्या नजरेतच दम आहे'. 'झापुक झुपूक' सिनेमाच्या टिझरमध्ये त्याची ही अदा दिसते आहे. त्याचबरोबर टिझरमध्ये सूरजची कॉमेडी, हटके स्टाईल, त्याचा भन्नाट अभिनय आणि फुल्ल ऑन मनोरंजनचा तडाखा हे कॉम्बिनेशन दिसते आहे. त्यामुळेच हा सगळा मालमसाला सिनेमामध्ये अनुभवायला मिळेल.



हालाखीच्या परिस्थितीतून वर येऊन सूरजने प्रसिद्धी मिळवली आणि माणुसकीही जपली. त्याची हीच मेहनत आता यश देऊन जाणार आहे. एकूणच ग्रामीण भागातील हा मुलगा सध्या भरपूर चर्चेत आहे. मराठी मातीतल्या साध्याभोळ्या सूरजसाठी प्रेक्षकांमध्ये कमालीची क्रेझ निर्माण झाली आहे.

सूरज चव्हाणसोबत या चित्रपटात अनेक मराठी कलाकार दिसतील. त्यात जुई भागवत, इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, पायल जाधव, पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी आणि दीपाली पानसरे हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. अलिकडेच सूरजने जेजुरीच्या खंडोबाचे, आईमरी मातेचे आणि मोरगावच्या गणपतीबाप्पाचे दर्शन घेत सिनेमाच्या प्रमोशनची जोरदार सुरुवात केली. 'झापुक झुपूक' येत्या २५ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्रातील सिनेमागृहामध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## प्रत्यक्ष सहभाग की प्रमोशन?

नीरज पांडे यांच्या दिग्दर्शनाखाली आकार घेणाऱ्या 'खाकी: द बंगाल चॅप्टर' या वेब सिरीजबाबत नवनवीन अपडेट्स येत आहेत. त्यातही नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणाऱ्या या मालिकेशी एका लोकप्रिय क्रिकेटपटूचे नाव जोडले गेले आहे. तो दुसरा तिसरा कोणी नसून साक्षात सौरव गांगुली आहे. 'खाकी: द बंगाल चॅप्टर'मधून सौरव गांगुलीचा एक व्हिडिओ समोर आला असून त्यात तो खाकी गणवेशात दिसत आहे. प्रोमोमध्ये तो म्हणतो, 'तू बंगालवर एक शो करणार आहेस आणि बंगालच्या दादाला आमंत्रित करायला विसरला?.' यानंतर तो चित्रपटाच्या सेटवर पोहोचतो. जिथे दिग्दर्शक त्याला भूमिका देण्यास सहमत होतो. पात्राची चर्चा केली जाते तेव्हा त्याला राग दाखवण्यास सांगितले जाते. याला उत्तर म्हणून, गांगुली मोठ्याने ओरडू लागतो आणि सेटवरील वातावरण मजेदार होते... हे सगळे दाखवणारा प्रोमो सध्या चर्चेत आहे. प्रोमोमध्ये एक मोठा ट्विस्ट पाहायला मिळतो जेव्हा त्याला एका गुंडाला मारहाण करण्यास सांगितले गेले. यासाठी गांगुली त्याच्या प्रसिद्ध क्रिकेट शॉट्सची नावे घेतो. परंतु त्याला हे सर्व फक्त ८ सेकंदात करायचे असल्याचे सांगितले जाते तेव्हा तो ही भूमिका



करण्यास नकार देतो. यानंतर, दिग्दर्शकाने त्याला मालिकेत सामील होण्यासाठी एक नवीन भूमिका देतो आणि तोदेखील लगेच तयार होतो. हे सर्व बघता गांगुली या मालिकेच्या कलाकारांचा भाग असेल पण त्याचे प्रमोशन करताना दिसेल अशी अटकळ आपण बांधू शकतो. नीरज पांडेच्या या बहुप्रतिक्षित मालिकेत रवी किशन, करण टॅकर, अविनाश तिवारी, अभिमन्यू सिंग आणि आशुतोष राणा हे कलाकार मुख्य भूमिकेत दिसत आहेत.